# सप्तसुरात स्वामी

सा रे ग म प ध नी सा
सा नी ध प म ग रे सा
सप्तसुरांचा रंगला जलसा आज इथे जलसा
मन त्रृप्त शांत मधुर सुरात भिजले तुझ्याच परमेशा
स्वामी तुमच्या नामसुरावर सरी नामसुरांच्या
पुलकित झाली गात्रे माझी भाव फुलला भक्तीचा
मन आकंठ बुडाले मधुर सुरात चिंब नहाले
स्पंदन तव नामाचे रोमरोमी झंकारले
आनंदाचे झरे उंचची उडता जीवाशिवाचे मीलन झाले
सप्तसुरांचा रंगला जलसा आज इथे जलसा
मन त्रृप्त शांत मधुर सुरात तुझ्याच भिजले परमेशा
गान मधुर नामाचे तव गंभीर भूप रागात
ह्रदयात भाव फुलले अति शांत शांत
सूर आसावरीचे छेड़ता तव नामाचे
मी विसरले देहभान माझे नि कालाचे
सप्तसुरांवर तव नामाचे गीत गाईले
अति मधुर भाव बहरता जीवन माझे त्रृप्त जाहले
सप्तसुरांचा रंगला जलसा आज इथे जलसा
मन त्रृप्त शांत मधुर सुरात भिजले तुझ्याच परमेशा
लाभला आनंद मुक्तिचा तव नामसुरांत स्वामी
स्फूर्तीचा झरा गवसला तव चिंतनात स्वामी
दया क्षमा करुणेचा प्रेमसूर तुम्ही
वरदान लाभो अखंड तुम्हें प्रभू प्रार्थिते मी.............

**- हेमा जोशी**
**पुणे**